
सोमवार, २० फेब्रुवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २१३
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशाची प्रगती : ना. शाह



**कोल्हापूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नऊ वर्षांमध्ये मोठे परिवर्तन केले. त्यामुळे देशाची प्रगती झाली, सुरक्षा झाली व देशात समृद्धी आली, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि. १९) कोल्हापूर येथे केले. भाजपच्या विजय संकल्पयात्रा सभेत ते बोलत होते. मागील लोकसभा निवडणुकीत आपण महाराष्ट्रातील ४८ पैकी ४२ जागा जिंकलो होतो. आपल्याला बहुमत मिळाले होते, पण यावर आपली संतुष्टी झाली नाही पाहिजे. या वेळी आपल्याला केवळ बहुमत नको, तर संपूर्ण विजय हवा आहे. ४८ पैकी ४८ जागा मिळायला हव्यात, असे ना. अमित शाह म्हणाले. या वेळी त्यांनी विरोधकांवर टीका केली तसेच २०२४ची निवडणूक महान भारताच्या रचनेसाठी आणि समृद्ध भारत बनविण्याची असल्याचेही त्यांनी म्हटले. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

## अंतरंग

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर चाकूने वार/२
पनवेल येथील पाली देवदमध्ये विकासकामांचा शुभारंभ/३
मुरूडच्या खोरा बंदरातील वाहनतळ झाले खुले/५

# शिवजयंतीचा सर्वत्र अभूतपूर्व उत्साह!

## पनवेलमध्ये भव्य अन् पारंपरिक मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती रविवारी (दि. १९) पनवेलमध्ये महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यामध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी सहभागी होत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेला अश्वारूढ पुतळा व टपाल नाका येथील अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी अशा जयघोषात, ढोल ताशा आणि लेझीमच्या गजरात भव्य मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीत भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, तहसीलदार विजय तळेकर, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी व कर्मचारी, शहरातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीस सुरुवात झाली. या मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषेमधील ४० महिलांचा समूह, शिवरायांच्या जीवन चरित्रातील प्रसंग दर्शविणारे तीन चित्ररथ, सात शाळांच्या विद्यार्थ्यांचे लेझिम पथक व बॅन्जो पथक यांचा समावेश होता. ही मिरवणूक शहरात फिरून टपाल नाका येथे आली. तेथे महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीची सांगता झाली.



यानंतर पुढील कार्यक्रमांसाठी मिरवणुकीतील सहभागी स्पर्धक व शिवप्रेमी हे आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात एकत्र आले. तेथे महाराष्ट्राचे राज्यगीत 'जय जय महाराष्ट्र माझा'चे सामुहिक गायन झाले. त्यानंतर पहाडी आवाजात राहुल सोनावणे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत पोवाडा सादर केला. मग रोअर डान्स अकॅडमी, प्रभू डान्स अकॅडमीच्या मुलांनी समूह नृत्य सादर केले. गार्गी ग्रुपच्या सुमारे ५० जणांच्या पथकाने शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग अत्यंत सुंदररित्या शिवचरित्रातून सादर केले तसेच वृद्धी भाटिया, रायन मनोरे यांनी नृत्य सादर केले. दिमाखदार सादरीकरणानंतर मिरवणुकीतील लेझीम पथकांना व चित्ररथांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरीत करण्यात आले.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## उलवे नोडमध्येही शिवरायांना अभिवादन



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पनवेल तालुक्यातील गव्हाण-कोपरसह उलवे नोड येथे कार्यक्रमांचे आयोजन करून महाराजांना मानाचा मुजरा करण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला तसेच प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

गव्हाण-कोपर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. उलवे नोडमधील खारकोपर रेल्वेस्थानकासमोर शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. तेथेही शिवजयंती उत्साहात साजरी झाली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, सरचिटणीस महेंद्र घरत, गव्हाणच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, वसंत म्हात्रे, जयवंत देशमुख, किशोर पाटील, अनंता ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, विश्वनाथ कोळी, मनोज घरत, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, सुनिता घरत, उषा देशमुख, अर्चना मिश्रा, सुजाता पाटील, आनंद देशमुख, कमलाकर देशमुख, वसंत पाटील, सुधीर ठाकूर, जयश्री घरत, अशोक कडू, व्ही. के. ठाकूर, पी. के. ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मार्गदर्शन करून सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.





## वेशभूषा स्पर्धेला प्रतिसाद; विजेत्यांना पारितोषिक वितरण

**पनवेल** : भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक १९च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणुकीनिमित्त मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे या वेशभूषा स्पर्धेचे तिसरे वर्ष होते. मोठ्या उत्साहात ही स्पर्धा गावदेवी पाडा येथे झाली.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाले. यात पहिला क्रमांक अभिर बावळे, द्वितीय वेदिका पवार, तृतीय अस्मी शेट्टे, तर उत्तेजनार्थ संस्कार पाटील, आराध्या पटवर्धन, काव्या थोरात यांनी मिळविले. त्यांना भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सचिव चिन्मय समेळ, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, देवांशु प्रभाळे, प्रशांत शेट्टे, सुमित झुंजारराव आदी उपस्थित होते.

## शिवनेरी किल्ल्यावर शासकीय सोहळा

**जुन्नर : प्रतिनिधी**

राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव साजरा करण्यात येत असताना किल्ले शिवनेरीवरही शासकीय स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुंदर फुलांच्या सजावटीत पारंपरिक पद्धतीने विधिवत शिवजन्मोत्सवाचा सोहळा झाला. नऊवारी नेसलेल्या महिला कलाकारांनी या वेळी शिवरायांचा पाळणा गायला.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवरायांचा मावळा राज्याचा मुख्यमंत्री झाला आहे. संभाजीराजे छत्रपती आपण केलेल्या सर्व सूचनांची आम्ही दखल घेतली आहे. कोणत्याही शिवभक्तांना



छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेण्यापासून रोखता येणार नाही, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पुढच्या वर्षी कोणत्याही शिवभक्तांची अडवणूक केली जाणार नसल्याचे सांगून शिवरायांच्या विचारानेच हे सरकार काम करीत असल्याचे नमूद केले.

## आग्रा किल्ल्यात शिवजयंती साजरी

**आग्रा : वृत्तसंस्था**

येथील ऐतिहासिक किल्ल्यात यंदा प्रथमच शिवजयंती साजरी करण्यात आली. या सोहळ्यास महाराष्ट्रातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मराठेशाहीच्या इतिहासात आग्रा येथील किल्ल्याला मोठे महत्त्व आहे. शिवछत्रपतींनी याच किल्ल्यातील दिवाण-ए-आममध्ये औरंगजेबसमोर बाणेदारपणाचे दर्शन घडविले होते. हा परिसर यंदा शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने निनादला. आग्रा किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्याची मागणी काही सामाजिक संस्थांनी केंद्र शासनाकडे केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारचा सांस्कृतिक विभाग आणि पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला पत्र लिहून महाराष्ट्र शासन काही सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती साजरी करणार असल्याचे कळविले. त्यानुसार पुरातत्त्व विभागाने महाराष्ट्र शासनाला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्याची अनुमती दिली. त्यानुसार हा सोहळा झाला.

## केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुण्यात शिवसृष्टीचे लोकार्पण

**पुणे : प्रतिनिधी**

शिवशाहीर दिवंगत बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून पुण्यात साकारलेल्या शिवसृष्टीचे लोकार्पण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते शिवजयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारताचे काय झाले असते हे सगळ्या जगाला माहीत आहे. पाकिस्तानची सीमा शोधण्यासाठी फार दूर जावे लागले नसते. कदाचित तुमच्या माझ्या घराच्या बाहेरच ही सीमा असती, असे ते या वेळी म्हणाले.



या सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार शिवेंद्रराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवसृष्टीचा प्रकल्प ४३८ कोटींचा आहे. याचा पहिला टप्पा सुरू झाला असून चार टप्पेही दिलेल्या वेळात पूर्ण होतील याचा विश्वास आहे, असे ना. शाह या वेळी म्हणाले.

## दुसऱ्या कसोटीतही ऑस्ट्रेलिया निष्प्रभ

### भारताचा विजय; मालिकेत २-०ची आघाडी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळविला. रवींद्र जडेजा-रविचंद्रन अश्विन या फिरकी जोडगोळीने पुन्हा एकदा 'कांगारू'ची पळताभुई थोडी केली. यासह मालिकेत भारताने २-०ने विजयी आघाडी घेतली आहे. १००वी कसोटी खेळणारा चेतेश्वर पुजाराने विजयी चौकार मारला.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलिया संघ एक विकेट गमावत ६२ धावांच्या आघाडीसह फलंदाजीला उतरला होता. भारताच्या जडेजा आणि अश्विन या जोडीने ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांच्या नाकी नऊ आणले. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी झटपट विकेट्स गमावल्या. त्यांचे चार फलंदाज तर एकाच धावसंख्येवर तंबूत परतले. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव ३१.१ षटकांत ११३ धावांवर संपुष्टात आला. भारताकडून जडेजाने सात बळी टिपले, तर अश्विनने तीन गडी बाद केले.





भारताचीही दुसऱ्या डावात ११५ धावांचा पाठलाग करताना सुरुवात फार चांगली झाली नाही. अवघ्या ६ धावांवर संघाची पहिली विकेट पडली. राहुल केवळ एकच धाव काढू शकला. त्यानंतर कर्णधार रोहित शर्माने मोठे फटके मारत भारताचा डाव पुढे नेला, मात्र ३१ धावा करून रोहित धावबाद झाला. त्यानंतर आलेल्या विराट कोहलीलादेखील फार काही करता आले नाही. २० धावा करून तो बाद झाला, तर श्रेयस अय्यर मोठा फटका मारताना १२ धावा करून बाद झाला. १००वी कसोटी खेळणाऱ्या पुजाराने संयमी खेळी दाखवत भारताला विजयापर्यंत पोहचवले. त्याने ३१ धावा केल्या. यष्टीरक्षक केएस भरतही २३ धावा करून नाबाद राहिला.

**संक्षिप्त धावफलक**

ऑस्ट्रेलिया (पहिला डाव) : ७८.४ षटकांत सर्वबाद २६३, ऑस्ट्रेलिया (दुसरा डाव): ३१. षटकात सर्वबाद ११३, भारत (पहिला डाव) : ८३.३ षटकांत सर्वबाद २६२, भारत (पहिला डाव) : २६.४ षटकात ४ बाद ११५ (टीम इंडिया विजयी).

## खालापूरच्या ताकईत अत्याचाराच्या दोन घटना

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ताकई गावच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाला आहे. यातील एका घटनेत तर सावत्र बापानेच मुलीवर अत्याचार करीत नात्याला काळीमा फासला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

आरोपी रामबाबू वृंदावन पटेल (वय ४५) याने घरात कोणी नसताना आपल्या १५ वर्षीय सावत्र मुलीवर जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. जवळपास सहा महिने नराधम मुलीवर अत्याचार करीत होता. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. आरोपी रामबाबूविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटक केली.

दुसऱ्या घटनेत आरोपी गुरू रमेश पवार याने ताकई गावात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. त्यातून पीडित मुलगी सात महिन्यांची गर्भवती असल्याचे पालकांच्या लक्षात आल्यानंतर आरोपी गुरू पवारविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## पेणजवळ भीषण अपघात; तिघे ठार, पाच जण जखमी



**पेण : प्रतिनिधी**

पेण-खोपोली मार्गावर पेणजवळ वाक्रुळ येथे रविवारी (दि. १९) संध्याकाळी ट्रक आणि इकोची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार, तर पाच जण जखमी झाले आहेत.

अपघातातील सर्व मयत आणि जखमी हे संत बाळूमामांच्या यात्रेसाठी इको (एमएच ए-१००३)मधून कोल्हापूरच्या दिशेने चालले होते, तर ट्रक (एमएच ४३- बीजी ३२३४) खोपोलीहून पेणकडे येत होता. वाक्रुळजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की इकोमधून प्रवास करणारे विक्रम गोविंदराव दिंडे (५०), चालक नागेश विक्रम दिंडे (२४) व प्राजक्ता नागेश दिंडे (२५) जागीच ठार झाले, तर याच गजानन चंदन वडगावकर, (१३), विकी विठ्ठल श्रीरामे (१५) मीनक्षी विक्रम दिंडे (२२), कविता विक्रम दिंडे (४५) व विठाबाई संजू वडगावकर हे गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघातातील दिंडे परिवार हा मूळचा कोल्हापूर जिल्ह्यातील आहे. नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने ते पेणमधील फणसडोंगरी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्य करून आहेत. दरवर्षी ते कोल्हापूरमधील संत बाळूमामा यात्रेसाठी जात असतात. या वर्षीही निघाले असताना अपघात झाला. या अपघाताची नोंद पेण पोलिसांत करण्यात आली आहे.

अपघाताचे वृत्त समजताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. देवदूत टीमनेही कार्यवाही करून जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले. जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी भेट देऊन पाहणी केली.

# उद्धव ठाकरेंनी सिद्धांतांचा बळी दिला

## कोल्हापुरात केंद्रीय मंत्री अमित शाह यांचा हल्लाबोल

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहेत. कोल्हापूरात एका कार्यक्रमाला संबोधित करताना शाह यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली होती, पण उद्धव ठाकरेंनी सिद्धांतांचा बळी देत बाळासाहेब ठाकरेंची पार्टी शरद पवारांच्या चरणात नेऊन ठेवली, अशी टीका अमित शाह यांनी यावेळी केली.

उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना अमित शाह म्हणाले, मागील नऊ वर्षांपासून आम्ही सरकार चालवत आहोत. पण १२ लाख कोटींचा घोटाळा करणारी काँग्रेस पार्टी आणि त्यांचे सहकारी आमच्यावर एक पैशाचाही आरोप करू शकले नाहीत. आम्ही प्रामाणिकपणे काम केले. पंतप्रधान मोदींवर भ्रष्टाचाराचा आरोप लावण्याची कुणाचीही हिंमत नाही.

२०१९मध्ये आपण देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढलो होतो. निवडणुकीच्या प्रचारात नरेंद्र मोदींचा मोठा फोटो लावला होता, तर उद्धव ठाकरे यांचा लहान फोटो लावला होता. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत आहोत, असं तेही अनेकदा बोलले होते. मी आणि मोदींनीही अनेक ठिकाणी हेच बोललो होतो. पण निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर त्यांच्या (उद्धव ठाकरे) तोंडाला पाणी सुटले. त्यांनी आपल्या सर्व सिद्धांतांना मूठमाती देऊन ते शरद पवारांच्या चरणाजवळ जाऊन बसले, अशा शब्दांत शाह यांनी हल्लाबोल केला आहे.



शाह पुढे म्हणाले, भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे मुख्यमंत्री आमचाच बनायला हवा होता. आम्हाला सत्तेचा लोभ नाही. आम्ही सत्तेसाठी सिद्धांतांचा बळी दिला नाही. उद्धव ठाकरेंमुळे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची पार्टी शरद पवारांच्या पायात जाऊन बसली होती, पण आता काळ बदलला आहे. खरी शिवसेना धनुष्यबाणासह भाजपबरोबर आली आहे. आज एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनवण्याचं काम भाजपने केले आहे. आज त्यांना (उद्धव ठाकरे) धडा शिकवण्याचे कामही झाले. मागील लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ४२ जागा जिंकलो होतो. आपल्याला बहुमत मिळाले होते, पण यावर आपली संतुष्टी झाली नाही पाहिजे. या वेळी आपल्याला बहुमत नको आहे. संपूर्ण विजय हवा आहे, अशी अपेक्षाही शाह यांनी या वेळी व्यक्त केली.

**▮ आई अंबाबाई, सर्वांना सुख, समृद्धी दे!**

*केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मीचे दर्शन घेतले. या वेळी केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी पत्नी करवीर कन्या सोनल शाह यांच्यासह कुंकूमार्चन पूजा केली. 'आई अंबाबाई, सर्वांना सुख, समृध्दी दे!' अशी प्रार्थनाही या वेळी केली.*

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर चाकूने हल्ला

**खारघरमधील घटना**

**पनवेल : वार्ताहर**

पत्नी दुसऱ्या व्यक्तीसोबत फिरत असल्याच्या संशयावरून एका व्यक्तीने भर रस्त्यात आपल्या पत्नीच्या गळ्यावर चाकूने वार करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना खारघर सेक्टर-१३ मध्ये उघडकीस आली आहे. दादाराव सहदेव इंगळे असे या व्यक्तीचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पतीच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेवर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

या घटनेतील आरोपी पती दादाराव इंगळे व गंभीर जखमी असलेली त्याची पत्नी दोघेही खारघर सेक्टर-१३ मध्ये चार मुलांसह राहण्यास आहेत. दादाराव हा पत्नीवर नेहमी संशय घेत असल्याने या दोघांमध्ये सतत भांडण होत होते. घटनेच्या दिवशी या पती-पत्नीमध्ये नेहमीप्रमाणे भांडण झाले.

त्यामुळे हे दोघे भांडण करत रस्त्यावर आले. या वेळी त्यांची मुलदेखील त्यांच्या सोबत होती. या दोघांमध्ये सेक्टर-१३ मधील शहीद मुकेश पेट्रोल पंपाजवळ जोरजोरात भांडण सुरू होते.

याचवेळी दादाराव इंगळे याने रागाच्या भरात पत्नीच्या गळ्यावर वार करून त्या ठिकाणावरून पलायन केले. त्यामुळे गंभीर जखमी झालेल्या पत्नीला नागरिकांनी कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले.

या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी दादाराव इंगळे याचा शोध घेऊन त्याला अटक केली. दादाराव याच्यावर जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांनी दिली.

## हिरकणी जीवन गौरव पुस्कार सुमन जाधव यांना प्रदान

**ठाणे : रामप्रहर वृत्त**

पारनेर येथील करजुले या गावी शिवसाई मंडळाच्यावतीने नान्नजीभाई ठक्कर आणि ह.भ.प श्री सरकटे महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हिरकणी जीवन गौरव पुस्कार सुमन सुदाम जाधव यांना देण्यात आला.



सुमन जाधव यांनी लहानपणी म्हणजे १९७२ ते ७५च्या काळात रोज लांब दुसऱ्या गावात जाऊन शिक्षण घेतले. त्या काळात एवढ्या लांब जाऊन शिक्षण घेणारी ती गावातील एकमेव धाडसी मुलगी आणि वर्गात अभ्यासात ती नेहमीच प्रथम येत होती. त्यातून लग्न झाल्यावर त्यांनी मुलांना शिकवले. एकत्र कुटुंब पद्धती सांभाळून घराची प्रगती केली. मुलांच्या शिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडून मुलांना शिकविले. आज ही पुढची पिढी एकत्र कुटुंब पद्धतच चालवत आहे. तसेच मागील १३ वर्षे अनुसया पतपेढीचे सभासद व उपाध्यक्ष म्हणून सुमन जाधव सध्या कार्यरत आहेत.



**अलिबाग : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदींसह अन्य विभागातील अधिकारी कर्मचारी.**



**अलिबाग : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली. फेटा, सदरा अशा पारंपारीक वेशभुषेसह ढोल ताशांच्या गजरात संपूर्ण शहर दुमदुमून गेला.**

## गव्हाण विद्यालयात शिवजयंती उत्साहात

### महाराष्ट्र राज्यगीताचा झाला शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे, संस्थापक राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन. घरत ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहवर्धक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी व समन्वय सदस्य समिती सदस्य रवींद्र भोईर व लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदेशानुसार यावेळी शिवजयंतीच्या मुहूर्तावरच महाराष्ट्र राज्याच्या गौरवाची यशस्वी गाथा गाणाऱ्या राज्य गीताचाही शुभारंभ या वेळी करण्यात आला.

शिवाजी विद्यालयाच्या गायक वृंदाने या वेळी शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रेरक आणि गौरवशाली गीतांचेही गायन केले. या वेळी ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, प्रा. राजेंद्र चौधरी, द्रोपदी वर्तक तसेच विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे, धनाजी ठाकूर आप्पा, जनार्दन खैरे, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाचे भास्कर म्हात्रे, कांचन माने व शुभांगी थोरात, रमेश वर्तक तसेच दोन्ही विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे शिवजन्मोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने रविवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराजांची ३९३वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



या वेळी महाविद्यालयाच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून शिवचरित्राचा थोडक्यात आढावा घेतला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी राज्यगीतगायन करून कार्यक्रमाची शोभा वाढविली तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागप्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. गितीका तन्वर, सांस्कृतिक विभाग समन्वयक गणेश जगताप, प्रा. बी. ए. भोईर व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

## केदार भगत मित्र परिवाराकडून खिचडी वाटप

**पनवेल : वार्ताहर**

केदार भगत मित्र परिवार कडून महाशिवरात्री निमित्त रामेश्वर देवस्थान येथे खिचडी प्रसाद वाटप करण्यात आले. सुमारे दोन ते अडीच हजार भाविकांनी या प्रसादाचा आस्वाद घेतला.



या वेळी युवा नेते केदार भगत, रामेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष उमेश इनामदार, सुमित दसवंते, नितेश भगत, शेषनाथ गायकर, भावेश शिंदे, रवी परचे, संतोष वर्तले, हर्षद गडगे, योगेश साळवी, संकेत दसवंते, ब्रिजेश बहिरा, उज्वल पाटील, प्रमोद भगत, जयेश भगत, निकिता पाटील, गीतांजली भगत, योगिता डांगरे, संगीता पोतदार, ज्योती लांगी, अनिता मढवी उपस्थित होते. या वेळी केदार भगत मित्र परिवारातर्फे राबवण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल भाविकांनी कौतुक केले.

## जय भवानी तरुण विकास मंडळातर्फे शिवजयंती साजरी

**चौक : रामप्रहर वृत्त**

जय भवानी तरूण विकास मंडळ वावंढळ (कोयना जांब्रूक) ता. खालापूर यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली.

जय भवानी तरूण विकास मंडळ वावंढळ यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली. सकाळी शिव प्रतिमेचे पूजन सरपंच सुहास कदम, विलास कदम, रामदास काईनकर, जयवंत कदम व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत गायले. त्यानंतर शहरातून मोटार सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी महिलांनी शिवप्रतीमेची आरती केली. वावंढळ, चौक ते खालापूर राष्ट्रीय महामार्गावरून खालापूर येथील नगरपंचायतच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुन्हा वावंढळ येथे येऊन रॅलीने विसावा घेतला. यावेळी मंडळाचे सर्व सदस्य संख्येने उपस्थित होते.



## रस्त्यामध्ये तरुणांना अडवून लुटणाऱ्या त्रिकुटाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानक मालधक्का रोडवरून येत असताना तरुणांना रस्त्यामध्ये अडवून त्यांना धमकावून त्यांच्याकडून सोन्याची बाली व मोबाईल काढून घेणाऱ्या तीन आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

या घटनेतील फिर्यादी विशाल दतू कांबळे व त्याचा मित्र संदीप शर्मा हे पनवेल रेल्वेस्टेशन येथून चालत मालधक्का रोडवरून येत असताना त्यांना रस्त्यामध्ये तीन तरुणांनी अडवून त्यांना धमकावत एक सोन्याची बाली व दोन मोबाईल काढून घेतली.

याबाबत तरुणांनी पनवेल शहर पोलिसांकडे तक्रार दाखल करताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद पवार, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रवींद्र राऊत, नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, नाईक विनोद देशमुख, रवींद्र पारधी, शिपाई प्रसाद घरत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने आरोपींना अटक केली आहे.

तकदिर साळुंखे (वय १९), राजू धोत्रे उर्फ भाऊ (वय १९), आणि रोहित चव्हाण उर्फ बाबा (वय १९) असे आरोपींची नावे असून या तरुणांना ताब्यात घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यांच्याकडून पनवेल शहर पोलिसांनी ३२ हजार ६०० रुपये किमतीचे एक ग्राम वजनाची सोन्याची बाली व दोन मोबाईल जप्त केले आहे.

## वावे येथे गोवंशाची कत्तल करणाऱ्या दोघांना बेड्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रविवारी सकाळी ८.३०च्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील वावे येथे एका नर जातीच्या गोवंशाची कत्तल केल्याची घटना घडली आहे.

याबाबतची माहिती पोलादपूर तालुक्यातील नरवीर रेस्क्यु टीमचे दीपक उतेकर व त्यांचे सहकारी दिनेश दरेकर, राहुल जाधव, सुमित दरेकर, जयेश जगताप, सागर साळुंखे, दीपक शिंदे, उमेश पालकर, प्रतीक मोहिते यांनी हा प्रकार उघडकीस आणला आहे. याबाबत दिनेश श्रीधर दरेकर रा. प्रभातनगर यांनी पोलादपूर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.गोवंशाची कत्तल ही विक्रीसाठी केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. वावे मोहल्ला येथील अब्दुल करीम अलीमिया तांबे (वय ५२) , फैज इस्माईल काझी (वय ४५) या दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पोलादपूर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायद्या अंतर्गत गुन्हा रजिस्टर नं १५/२०२३ भा. द.वि.स. कलम ४२९,३४ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक विनोद महाडिक, स्वप्निल कदम, इकबाल शेख, संदीप शिरगावकर हे करीत आहेत.

# पाली देवदमध्ये विकासकामांचा शुभारंभ



## मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष अणि विकास हे एक समीकरण बनले आहे. त्यानुसार पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासाची कामे सुरू आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पाली देवद हद्दीत विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायतीमधील प्रभाग क्रमांक ४ येथे जि. प. मराठी शाळेचे बांधकाम करणे, प्रभाग क्रमांक ६ येथे शासनाच्या जनसुविधा योजनेंतर्गत १८ लाख नऊ हजार ९२९ रुपयांच्या निधीतून डंपिंग ग्राऊंड येथे घनकचरा व्यवस्थापन करणे, याच प्रभागात जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२२-२३च्या आठ लाख ५० हजार रुपयांच्या निधीतून विमलवाडी अंगणवाडीच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे, प्रभाग क्रमांक २ येथे १५वा वित्त आयोगनुसार सात लाख आठ हजार ४०१ रुपयांच्या निधीतून कांडपिळे पेट्रोल पंप ते घाटी आळीपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे, याच प्रभागात १५वा वित्त आयोगनुसार सात लाख ५३ हजार ७८३ रुपयांच्या निधीतून भगतवाडी येथील प्रेमनगरी बैठक हॉल ते एक्सप्रेस हायवेपर्यंत अंतर्गत गटार बांधकाम करणे, प्रभाग क्रमांक ५ येथे १५वा वित्त आयोगनुसार सात लाख रुपयांच्या निधीतून सिंडीकेट बँक ते गोकुळधाम सोसायटीपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे, प्रभाग क्रमांक ४ येथे १५वा वित्त आयोगनुसार चार लाख रुपयांच्या निधीतून नामदेव पोपेटा ते जगदीश पोपेटा घर अंतर्गत गटार बांधकाम व दुरुस्ती करणे, याच प्रभागात १५वा वित्त आयोगनुसारचार लाख रुपयांच्या निधीतून जयवंत पोपेटा ते रामदास पोपेटा घरापर्यंत गटार बांधकाम व दुरुस्ती करणे, प्रभाग क्रमांक १ येथे जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२२-२३च्या १० लाख रुपयांच्या निधीतून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. या सर्व विकासकामांचे भूमिपूजन महाशिवरात्रीचे औचित्य साधून करण्यात आले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, बॉम्बे राऊंड टेबल १९चे चेअरमन विनय महेश्वरी, उद्योजक विनय अग्रवाल, पनवेल पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सीताराम मोहिते, भाजप पालीदेवद जि. प. अध्यक्ष किशोर सुरते, सरपंच योगिता राजेश पाटील, उपसरपंच दिवेश भगत, माजी उपसरपंच आलुराम केणी, बुवाशेठ भगत, अशोकशेठ पाटील, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस उदय म्हस्कर, पाली देवद ग्रामपंचायतीचे सदस्य महेश पाटील, पुष्पा म्हस्कर, अनिता पाटील, चेतन केणी, युवा नेता प्रमोद भगत, रवींद्र केणी, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष महेश केणी, माजी ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील, ज्येष्ठ नेते आत्माराम पाटील, ग्रामविकास अधिकारी सुदीन पाटील, भाजप महिला मोर्चा तालुका चिटणीस प्रिया वाघमारे, हनुमंत खुटले आदी गावातील सर्व ज्येष्ठ कार्यकर्ते, ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते, ग्रामपंचायत कर्मचारी, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# उलवे नोडमध्ये शिवजयंतीनिमित्त उपक्रम; लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील उलवे नोड से. २० येथे शिवराज शैक्षणिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा मंडळ उलवेच्या वतीने श्री छत्रपती शिवजन्मोत्सव सोहळा यानिमित्त चित्रकला स्पर्धा आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे या स्पर्धेचे तिसरे वर्ष आहे. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याचप्रमाणे उलवे सेक्टर ५ येथे शिवसह्याद्री मित्र मंडळ यांच्यावतीने शिवजन्मोत्सव सोहळा आयजीत करण्यात आला होता. या सोहळ्याला हितेश शिंगारे, संदीप साळुंखे, भाजप उलवे नोड-१चे उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, अध्यक्ष अमोल चव्हाण, उपाध्यक्ष अजय पवार, खजिनदार अजित चोरगे, सचिव राहुल घोलप संदेश साळुंखे, हितेश शिंगारे, संतोष शिंदे, अमोल कदम, विजय गडाख, गणेश नागले, सचिन बोर्हाडे, विशाल म्हात्रे, सुहास भोसले, विवेक बनकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## घरफोडी करणारे दोन जण ताब्यात

**पनवेल :** घरफोडी करणाऱ्या दोन आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

करंजाडे येथील तथास्तु इमारतीत घराचे दरवाज्याचे लॉक तोडून आत प्रवेश करून सात ग्रॅम वजनाचे सोन्याचे बेसलेट व एक गॅस सिलिंडर चोरी झाल्याची घटना घडली होती. घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात होताच पोलिसांच्या पथकाने गुप्त बातमीदारांकडून आरोपींची माहिती काढली. यानुसार पोलिसांनी आरोपी शोएब कच्ची (वय २७) आणि विपुल रायकर (वय २८) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्हा कबूल केला. त्यांनी गुन्ह्यात चोरलेल्या एकूण ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला आहे.











**पनवेल : तालुक्यात विविध ठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्या अंतर्गत नावडे, आकुर्ली, तोंडरे, वलप या ठिकाणच्या शिवजयंती सोहळ्याला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर आदी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : वीर योद्धा फाऊंडेशनच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावरून पनवेल येथे ज्योत आणण्यात आली. या वेळी शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत केले. यासोबतच महापालिकेतर्फे सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी कमांडो करियर अकॅडमीचे अध्यक्ष संतोष जगताप, विचुंबे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रमोद भिंगारकर, राकेश मोरे, चांगदेव मराठे, गणेश सावंत, भीमराव भोपळे तसेच अकॅडमी सर्व टीम उपस्थित होती.**



**पनवेल : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तोंडरे येथे आयोजित सोहळ्याला भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.**



**उरण : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुळसुंदे येथे आयोजित करण्यात आलेल्या शिवजयंती उत्सवात आमदार महेश बालदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना विनम्र अभिवादन केले. या वेळी भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, ग्रामपंचायत सदस्य मनोज पवार, अनंता म्हामनकर, युवा नेते प्रशांत पाटील, ठाकरे गट शिवसेनेचे प्रथमेश पाटील, स्वप्नील चौलकर, आदित्य गाताडे, जयराम शिंदे व वारसा प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.**



**पनवेल : तक्का येथील मोराज रिक्षा स्टँडसमोर दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन महाराजांना वंदन केले. त्याचप्रमाणे सोसायटीत जाऊनही अभिवादन केले. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रतिक बहिरा, उमेश इनामदार यांच्यासह प्रभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते व तक्का गाव व कॉलनी परिसरातील नागरिक उपस्थित होते.**





**कामोठे : सेक्टर ६ येथे शिवजयंतीनिमित्त शनि मंदिर परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच आयोजकांचे कौतुक केले. या वेळी आदित्य भगत, रवी जोशी, समीर पाटील आदी उपस्थित होते.**

**पनवेन : युथ सोशल फाउंडेशनच्या वतीने नवीन पनवेल डी-मार्टसमोर शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन महाराजांना मानाचा मुजरा केला. या वेळी मयुर आंग्रे, हेमंत ठाकूर, देवेंद्र परब, कुलबिरसिंग तांडोक, रघु गुणगा, योगेश पवार, घनश्याम भोईर, सागर फोकणे, बाळकृष्ण शिरसाठ, बिट्टू शिरसाठ, अमोल घायाळ आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.**



## संपादकीय

# प्रभो शिवाजी राजा..!

महाराष्ट्राचे नव्हे; तर अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती रविवारी अभूतपूर्व उत्साहात साजरी झाली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवरायांचे कार्य आणि इतिहास सारेच जाणतात. स्वराज्यासाठी त्यांनी दिलेले योगदान कदापि विसरता येणार नाही. म्हणूनच जयंतीनिमित्त त्यांना विविध उपक्रमांनी मानाचा मुजरा करण्यात आला.

**हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती, जाणता राजा, श्रीमंत योगी यांसारख्या अनेक उपाध्यांनी ज्यांचा जयजयकार केला जातो ते म्हणजे राजाधिराज शिवाजी महाराज! ज्या काळी रयतेला गुलामासारखे राबविले जात होते, मुली-महिलांची इज्जत खुलेआम लुटली जात होती, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नव्हता अशा परिस्थितीत शिवनेरी किल्ल्यावर जन्माला आला तो निधड्या छातीचा मर्द शिवबा. माता जिजाऊ आणि वडील शहाजीराजे यांचे हे अपत्य, ज्याने पुढे आपल्या कार्यातून आदर्श निर्माण केला. तेव्हा आदिलशहा, निजामशहा, मुगल व इतर काही शक्ती आपल्या देशाला अक्षरश: लूटत होते. त्यांच्याविरोधात लढण्याचे सोडाच, पण आवाज उठविण्याचीही कुणाची हिंमत नव्हती. सगळीकडे भीतीदायक वातावरण आणि अस्वस्थता होती. अशा वेळी शिवरायांनी सुरुवातीला निवडक सहकाऱ्यांना सोबत घेत रायरेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. यासाठी त्यांना मातोश्री जिजाऊंची प्रेरणाही महत्त्वाची होती. हा लढा सोपा नव्हता. नवे संघटन उभे करून एकाच वेळी अनेक पातळ्यांवर लढायचे होते, पण हे शिवधनुष्य शिवराय व त्यांच्या शिलेदारांनी लीलया पेलले. उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव न बाळगता राजांनी सर्वप्रथम अठरा पगड जाती-धर्माच्या मावळ्यांना गोळा केले. त्यांच्यात देशनिष्ठा जागवून लढण्याची शक्ती निर्माण केली आणि गनिमांच्या ताब्यात असलेले किल्ले एक एक करून पुन्हा स्वराज्यात आणले. जनतेला निर्भयपणे जगण्याचा हक्क व न्याय त्यांनी मिळवून दिला. म्हणूनच राजांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशा या राजांचा जन्मोत्सव अर्थात शिवजयंती यंदाही मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरी करण्यात आली. यानिमित्त मिरवणूक, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम अशी रेलचेल होती. शिवरायांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, छत्रपती संभाजीराजे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा झाला, तर पुण्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते शिवसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. विशेष म्हणजे यंदा प्रथमच आग्रा येथील किल्ल्यातही 'जय भवानी जय शिवाजी'चा जयघोष घुमला. केंद्र सरकारच्या अखत्यारित येणाऱ्या पुरातत्त्व विभागाने आग्रा किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्यास परवानगी दिल्याने तेथेही शिवजयंतीचा सोहळा रंगला. म्हणजेच दिल्लीच्या तख्तानेही शिवरायांचा उचित गौरव केला. निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू। अखंडस्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी। असे राजांचे वर्णन समर्थ रामदासस्वामींकडून करण्यात आले आहे. ते यथार्थच आहे. राजांनी स्वराज्य स्थापनेचा निर्धार करून तो तडीस नेला आणि जनतेला आधार दिला. अशा या पालनकर्ता राजास मानाचा मुजरा. राज्यात आणि केंद्रात शिवरायांच्या विचारांचे सरकार आहे. त्यामुळे येत्या काळात महाराजांच्या स्मृती अखंडपणे तेवत रहाव्यात यासाठी पावले उचलली जाण्याची शक्यता आहे. त्यातून राजांचा यथोचित गौरव होईल एवढे नक्की!**

# 'लालपरी'च्या ब्रेकमुळे कर्जतकरांची कोंडी

**खबरबात**
**विजय मांडे**



८० च्या दशकात लालपरीमुळे दळणवळण करणे सोपे झाले होते. त्यानंतर तीन चाकी रिक्षा, खाजगी वाहने सुरू झाली. कर्जतला त्याच सुमारास एसटी आगार सुरू झाले तत्पूर्वी पनवेलहून कर्जतकरांना एसटीची सुविधा मिळत होती. अनेक वर्षे दुग्धव्यवसायिक, चाकरमानी, विद्यार्थी याच लालपरीने इच्छित ठिकाणी प्रवास करीत असत. काही वर्षांपूर्वी प्रवासाची साधने, काही एसटी कर्मचाऱ्यांची मनमानी आदी कारणांमुळे एसटीला घरघर लागली. कोरोना काळात प्रवाशांसाठी असलेली एसटी बंद होती. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांनी संप केल्याने ही सुविधा बरेच महिने बंद होती. परिणामी प्रवाशांनी अन्य पर्याय निवडले आणि एसटीच्या अडचणींमध्ये भर पडली. त्याचा परिणाम खेड्या-पाड्यात असलेल्या सामान्य जनतेवर झाला. अनेक गावांमध्ये एसटी जायची बंद झाली. तिला ब्रेक बसला आणि सर्वसामान्यांची कोंडी झाली.

माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांच्या प्रयत्नाने १६ ऑक्टोबर १९८० रोजी कर्जत एसटी आगार सुरू झाले. तत्पूर्वी पनवेल आगराच्या एसटी बस कर्जतला येत असत आणि रेल्वे स्टेशन नजीकच्या एसटी स्टँड वरून बसचे नियोजन होत असे. आगार सुरू झाल्याने तालुक्याच्या अगदी दुर्गम भागात एसटी जाऊ लागली आणि सर्वांची सोय झाली. नवीनच आगार सुरू झाल्याने स्थानिक कर्मचारी आपल्या घरी दररोज जाऊ लागले अन्यथा त्यांना कामाच्या ठिकाणीच रहावे लागत असे व आठवडाभराने घर दिसत असे.

कर्जत तालुक्यात गावोगावी एसटी जाऊ लागली. ग्रामीण भागातील जनतेला ती आपलीशी वाटू लागली. कारण त्यांची खरी जीवन वाहिनी एसटीच होती. तालुक्याच्या ग्रामीण भागातील दुग्धव्यवसायिक याच लालपरीने मुंबईकडे जाण्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकावर येत असत. त्यावेळी फार थोड्या लोकांकडे स्वतः ची वाहने म्हणजे मोटरसायकल होत्या. एसटी नव्हती तेंव्हा दहा-बारा किलोमीटर अंतरावरील गावांमधून पहाटे बैलगाडीतून दुधाचे हांडे भरून येत असत तर पाच - सहा किलोमीटर गावातील व्यवसायिक डोक्यावर दुधाचे हांडे घेऊन कर्जत शहराकडे येत असत. त्यानंतर सायकल ही दुग्ध व्यवसायिकांची सखी बनली आणि गावो गावी एसटी सुरू झाल्यानंतर एक हक्काचे साधन दुग्धव्यवसायिकांसाठी ठरले. त्याकाळी आमदार, खासदार सुद्धा एसटीने प्रवास करीत असत. हे अनेकांनी पाहिले आहे.

एसटी सुरू झाल्याने मुलांच्या बरोबरीने मुलीही माध्यमिक शिक्षणासाठी शहरात येऊ लागल्या. त्यानंतर त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठीही लालपरीची खूप मदत झाली. आपल्यामुळेच हे सारे होत आहे. या अविर्भावात काही एसटी वाहक, चालकांच्या डोक्यात हवा गेली. त्यांची मग मनमानी सुरू झाली. एसटीत जागा असली तरी डबल बेल बाजू लागली. लोकांना पर्याय नव्हता म्हणून त्यांनी सारे काही सहन केले. कालांतराने अनेक प्रवासाची साधने उपलब्ध झाली. त्याचा परिणाम एसटीवर होऊ लागला. मग 'हात दाखविला तेथे थांबा' अशी संकल्पना सुरू झाली. त्यानंतर सहा असनी रिक्षा आल्या. या वाहनाचे विशेष म्हणजे अगदी घरा शेजारी नेऊन ते सोडत असत. त्यामुळे एसटी बाजूला असली तरी प्रवासी सहा असनी रिक्षेत बसू लागली आणि खऱ्या अर्थाने एसटीला घरघर सुरू झाली. कर्जत आगार कधीही बंद होईल. अशी परिस्थिती निर्माण झाली.

याही अवस्थेत आगार टिकविण्याची धडपड काही आगार व्यवस्थापकांनी केली. त्यामध्ये बी. डी. मगदूम, डी. एस. देशमुख, शंकर यादव यांची नावे घ्यावी लागतील. देशमुख तर चालक होते. त्यांच्याकडे आगार व्यवस्थापक पदाचा पदभार आला आणि त्यांनी आपल्या अनुभवाने कर्जत आगार जिल्ह्याबरोबर महाराष्ट्रात सुद्धा प्रथम क्रमांकावर नेऊन ठेवले. मात्र त्याचे बक्षीस म्हणून त्यांना खूप त्रास सहन करावा लागला होता. त्यानंतर यादव यांनी सुद्धा कोरोनाच्या काळात आगार सुस्थितीत राहण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनाही मनस्ताप सहन करावा लागला. कोरोना काळात संप केल्याने नवी मुंबई परिवहन सेवेच्या बस येऊ लागल्या. त्यांचे तिकीट एसटी पेक्षा कमी आहे. त्यामुळे प्रवाशांची आर्थिक बचत होऊ लागल्याने त्या बसची पसंती वाढू लागली. संप मिटल्यानंतर एसटी सुरू झाली पण ठराविक मार्गातील एसटीला प्रवासी मिळू लागले. अनेक गावांमधील एसटी प्रवाशांअभावी बंद करण्यात आल्या.


अनेक शाळा, महाविद्यालयाच्या बस गावापर्यंत नव्हे तर अगदी घरापर्यंत येऊ लागल्या. अनेक प्रवासाची साधने सहज उपलब्ध होऊ लागल्याने गावा गावातील एसटीला ब्रेक लागला आणि मग प्रवाशांना एसटीची उणीव भासू लागली. जेष्ठ नागरिकांना सवलत, विद्यार्थ्यांना सवलत, अपंगांना सवलत, विद्यार्थिनी व ७५ वर्षांनंतरच्या जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आदी लाभ घेणे बंद झाले. एसटी तोट्यात जाण्यात जेवढा काही आगाऊ कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे तितकाच गावो गावच्या प्रवाशांचाही आहे. हे कटू सत्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### 'या' बाजारात किलोच्या भावाने मिळतात लॅपटॉप

आजच्या या डिजिटल काळात लॅपटॉपचे महत्त्व नाकारता येणार नाही. लॅपटॉपच्या मदतीने ऑफिसच्या कामापासून ते शाळा-कॉलेजपर्यंतचे प्रोजेक्ट तयार करता येतात. पण, अजूनही असे बरेच लोक आहेत जे कमी बजेटमुळे चांगल्या कॉन्फिगरेशनसह लॅपटॉप खरेदी करू शकत नाहीत. पण आता काळजीचे कारण नाही. कारण आज आम्ही तुम्हाला काही स्वस्त लॅपटॉपबद्दल सांगणार आहोत, ज्या लॅपटॉपची शोरूमची किंमत कमीत कमी ३० ते ४० हजार रुपये असते, तो भारतातील या मार्केटमध्ये तराजूवर तोलून किलोच्या भावात विकला जातो. भारतातील या मार्केटमध्ये तुम्ही नगाने नव्हे, तर चक्क ५००० रुपये किलोप्रमाणे लॅपटॉप खरेदी करू शकता.



**परवडणारा लॅपटॉप बाजार**

दिल्लीत एक असे मार्केट आहे जेथे महागडे लॅपटॉप किलोच्या भावाने मिळतात. हे भारतच नाही तर आशियातील सर्वात मोठे आणि स्वस्त मार्केट आहे. ज्या लॅपटॉपची शोरूमची किंमत कमीत कमी ३० ते ४० हजार रुपये असते, तो येथे तराजूवर तोलून किलोच्या भावात विकला जातो. या मार्केटमध्ये चांगल्या कंडीशनचा लॅपटॉप फक्त ५ हजार रुपये किलोच्या रेटने खरेदी करता येतो. दिल्लीत हे मार्केट नेहरू प्लेसवर आहे. येथे असे अनेक शॉप आहेत जेथे लॅपटॉप फक्त ७ हजार रुपये वा त्यापेक्षा कमी किमतीत खरेदी केले जाऊ शकतात. या मार्केटमध्ये तुम्हाला कोणत्याही कंपनीचा लॅपटॉप किंवा कोणतेही गॅझेट उपकरण कमी किमतीत मिळेल. यासोबतच लॅपटॉपशी संबंधित ॲक्सेसरीजही येथे अतिशय कमी किमतीत उपलब्ध आहेत. मात्र, या बाजारातून काही खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

**'या' गोष्टींची काळजी घ्या**

* बाजारात अनेक दुकाने आहेत जी सेकंड हँड वस्तू विकतात. या प्रकरणात, खरेदी करण्यापूर्वी, इतर दुकानांमध्ये गॅझेटची किंमत शोधा.
* वस्तू खरेदी करण्यासाठी, तंत्रज्ञानाचे चांगले ज्ञान आणि गॅजेट्सचे चांगले ज्ञान असलेल्या व्यक्तीला सोबत घ्या, जेणेकरून खराब माल घरी येऊ नये.
* कोणतेही उपकरण विकत घेण्यापूर्वी त्याची पूर्ण तपासणी करून घ्या.
* लॅपटॉप खरेदी करण्यापूर्वी, तो काही काळ चालवा आणि डिव्हाइस व्यवस्थापकाकडे जा आणि त्याचे कॉन्फिगरेशन तपासा.

# चित्रपट अभिनेते अन्नू कपूर

**निमित्त**



अन्नू कपूर (जन्म २० फेब्रुवारी १९५६, जन्म नाव अनिल कपूर) हा एक भारतीय चित्रपट अभिनेता आणि दूरचित्रवाणीचा प्रस्तुतकर्ता आहे. १९९३ ते २००६ या काळातील झी टीव्ही वाहिनीवरिल अंताक्षरी या कार्यक्रमाचे प्रस्तुतकर्ता व अनेक चित्रपट जसे की मिस्टर इंडिया (१९८७), विकी डोनर (२०१२) आणि जॉली एलएलबी २ (२०१७) साठी ते प्रसिद्ध आहेत. विकी डोनर चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, तसेच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मधील सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.१२३

अन्नू कपूर यांचा जन्म मध्य प्रदेशातील भोपाळ मधील इटवारा येथे २० फेब्रुवारी १९५६ रोजी झाला. त्यांची आई कमल बंगाली आहे आणि वडिल मदनलाल हे पंजाबी आहे. त्यांच्या वडिलांची शहर आणि गावात काम करणारी एक पारशी नाट्य कंपनी होती. त्यांची आई कवी आणि प्रशिक्षित शास्त्रीय गायिका होती. त्यांचे आजोबा डॉ. कृपा राम कपूर ब्रिटिश सैन्यात डॉक्टर होते आणि त्यांचे पंजोबा लला गंगा राम कपूर, भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारक होते.

कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे माध्यमिक शिक्षणानंतर त्यांना शाळा सोडावी लागली. ४० रूपये पगारासह, त्याची आई एक शिक्षक म्हणून काम करीत होती. वडिलांच्या आग्रहाने ते आपल्या थिएटर कंपनीत रुजू झाले. राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे आधीचा विद्यार्थी असलेले त्यांच्या भावाने (रणजित कपूर) यांनी आग्रह धरल्यानंतर त्यांनी १९७६ मध्ये प्रवेश घेतला. १९८१ मध्ये राष्ट्रीय नाट्य विद्यालयतील पदवीनंतर, त्यांनी मुंबई मधील एक रुका हुआ फैसला या नाटकात ७० वर्षांच्या व्यक्तीची भूमिका साकारली. चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी त्यांना कौतुकाचे पत्र पाठवले आणि १९८३ च्या मंडी या चित्रपटासाठी त्यांना साइन केले.४ पूढे १९८६ मध्ये बासु चटर्जी यांनी एक रुका हुआ फैसला चित्रपटाचे दिग्दर्शन केले व अन्नू कपूर त्याचा भाग झाले. १९८४ च्या उत्सव या चित्रपटासाठी त्यांना विनोदी भूमिका श्रेणीत फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले होते. १९९३ मध्ये त्यांनी सरदार चित्रपटात महात्मा गांधींची भूमिका केली होती. हा हिंदी चित्रपट सरदार पटेल यांच्या चरित्रावर आधारित असून मुख्य भूमिका परेश रावळ यांनी केली होती. संत कबीर यांच्या भूमिकेमध्ये त्यांनी याव मालिकेमध्ये डीडी नॅशनल टीव्ही वर पण काम केले. १९९६ मध्ये त्यांनी कलापानी या मल्याळम भाषेतील चित्रपटात विनायक दामोदर सावरकरांची भूमिका साकारली.

तेजाब चित्रपटामध्ये काम करत असताना अनिल कपूर या चित्रपटाचा नायकात गोंधळ टाळण्यासाठी त्यांनी त्यांचे नाव बदलून अन्नू कपूर केले.५६

नाना पाटेकर, मून मून सेन आणि बेंजामिन गिलानी यांनी अभिनय केलेल्या अभय या चित्रपटाचे दिग्दर्शनही कपूरने केले. या चित्रपटाला १९९४ मधील सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला.

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथील महाशिवरात्री उत्सवातील पालखी सोहळ्यातील मानाची प्रथम पूजा उपविभागीय अधिकारी अमित शेडगे व तहसिलदार सचिन गोसावी यांचे हस्ते करण्यात आली. या वेळी सरपंच अमित खोत, सदस्य स्मिता पोवार, श्री कालभैरव जयंती उत्सव ट्रस्टचे कार्यवाह जगदीश कुलकर्णी, हरिहरेश्वर पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश कोलथरकर, मंडळ अधिकारी देऊळगावकर, तलाठी भामरे, व्यावसायिक निलेश बागाईत, संस्थेचे अध्यक्ष वामन बोडस, उपाध्यक्ष रमेश उळे, विश्वस्त निनाद गुरव जितेंद्र गुरव, प्रफुल्ल लिडर, सचिव-खजिनदार सिद्धेश पोवार उपस्थित होते.**

## आरोग्य प्रहर

### फळांसोबत चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी सकस आहार घेणे अत्यंत गरजेचे असते. अनेकदा आहार घेताना फूड कॉम्बिनेशन चुकतं आणि शारीरीक समस्या निर्माण होतात. फळांसोबत काय खायला पाहिजे आणि काय खाऊ नये, याबद्दल योग्य माहिती असणे आवश्यक असते. त्यामुळे फळांचं सेवन करताना नेहमी सतर्क राहिलं पाहिजे. फॅट टू स्लिमचे डायरेक्टर आणि न्यूट्रिशनिस्ट शिखा अग्रवाल शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, फळांसोबत काही खाद्यपदार्थांचं सेवन केल्यास आरोग्याला हानी पोहचू शकते. यामुळे तुमची पचनक्रिया खराब होऊ शकते. तसेच आरोग्याच्या अन्य गंभीर समस्यांनाही सामोर जावं लागू शकतं. त्यामुळे जाणून घेऊयात फळांसोबत कोणते पदार्थ खाल्ल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.



**संत्र्यासोबत गाजर खाऊ नका**

गाजर आमि संत्र्यांचं कॉम्बिनेशन आरोग्यासाठी हानीकारक ठरु शकतं. जर तुम्हाला ज्यूस प्यायला आवडत असेल. तर संत्र्याच्या ज्यूसमध्ये गाजराचे ज्यूस मिक्स करु नका. एक्सपर्ट सांगतात की, तुम्हाला याच्या सेवनामुळं हीटबर्नची समस्या होऊ शकते. तसेच किडनी खराब होण्याचा धोकाही संभवतो.

**पपई आणि लिंबू**

अनेक लोकांना फळांवर लिंबू मारून खाणं पसंत असतं. पण पपईवर लिंबू शिंपडल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. पपई आणि लिंबू एक घातक संयोजन आहे. ज्यामुळं एनीमिया आणि हीमोग्लोबिन मध्ये संतूलन राहण्यास अडथळा निर्माण होतो.

**पेरु आणि केळी**

काही लोकांना फ्रूट चाट खाणं पसंत असतं. फ्रूट चाटमध्ये पेरू आणि केळ्याचा समावेश असतो. पण हे कॉम्बिनेशन आरोग्यासाठी धोकादायक ठरु शकतं. हे दोन्ही फळं एकत्र खाल्ल्याने ॲसिडोसिस,मतली, गॅस आणि सतत डोकेदुखीची समस्या उद्भवू शकते.

**संत्र आणि दूध**

दूध आणि संत्र्याच्या मिश्रणाचे सेवन केल्यास पचनक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो. संत्र्यात असलेला ॲसिड भातात असलेल्या स्टार्चच्या पचनासाठी आवश्यक असेलेल्या एंजाइमला नष्ट करु शकतो. जर तुम्ही या फळांना एकत्र खाल्ल तर आजाराला आमंत्रण दिलं जाऊ शकतं.

# खोरा बंदरातील वाहनतळ झाले खुले

## काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण; पर्यटकांमध्ये समाधान

**मुरूड : प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेले खोरा बंदर येथील वाहनतळ पर्यटकांसाठी खुले करण्यात आल्याने पर्यटकांमधून समाधान व्यक्त होत आहे. त्याचप्रमाणे येथील रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे कामही पूर्ण झाले आहे.

राजपुरी येथे असणारा जंजिरा किल्ला पाहण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागामधून लाखो पर्यटक भेट देत असतात. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यावर पोहचवले जाते. खोरा बंदरात प्रवेश करताच येथील रस्ता हा खड्डेमय झाला होता. महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने खोरा बंदराच्या प्रवेशद्वारापासून ते बोटीपर्यंतचा सुमारे ३०० मीटरपेक्षा जास्त असणाऱ्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण पूर्ण झाले असून माती





व खडीच्या सहाय्याने साईडपट्ट्या भरण्याचे काम सुरू आहे. सुमारे दीड कोटी रुपये खर्च करून मेरीटाईम बोर्डाने हा काँक्रीटचा रस्ता बनवला आहे.

खोरा बंदरातील वाहनतळ बांधून दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी गेला तरी वाहनतळ बंदच होते, परंतु आता बोर्डाने सध्या पर्यटकांची वाहने येथे पार्क करून दिली जात आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या वाहन पार्किंगचा प्रश्न सुटला आहे. सुमारे २०० गाड्या पार्किंग होईल, असे हे वाहनतळ आहे.

## निवडक

### ब्रह्मकुमारी विश्व विद्यालयात रथयात्रा



**पाली** : पालीत प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात शिवाचा झेंडा उभारून महाशिवरात्री साजरी करण्यात आली. महाशिवरात्रीनिमित्त रथयात्राही काढण्यात आली. माजी सभापती साक्षी दिघे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी संचालिका ब्रम्हकुमारी मंगला दिदी व सर्व ओम शांती परिवार उपस्थित होता. या वेळी संचालिका ब्रम्हकुमारी मंगला दिदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### दिपेश कवळेला कांस्यपदक

**रेवदंडा** : नुकत्याच उत्तराखंड येथे झालेल्या २३व्या राष्ट्रीय सिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत अलिबागचा दिपेश कवळे हा सिनियर गटात कांस्यपदकाचा विजेता ठरला. दिपेश कवळे याने सिनियर गटात महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले. या सुयशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### ब्राह्मण मंडळातर्फे महाशिवरात्री साजरी

**रोहे** : ब्राह्मण मंडळाच्या श्री ओंकारेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शनिवारी श्री ओंकारेश्वर मंदिरात सकाळपासूनच विविध धार्मिक अनुष्ठाने झाली. मोहनराव साठे व मानसी साठे यांच्या हस्ते श्री ओंकारेश्वर महाराजांची पुजा व अभिषेक करण्यात आला. वे. मु. विवेक बापट यांनी पौरोहित्य केले .त्यानंतर उपस्थित ब्रह्मवृंदांनी लघुरुद्र अनुष्ठान करून गावाच्या कल्याणासाठी श्री ओंकारेश्वर महाराजांच्या चरणी प्रार्थना केली. उत्सवासाठी ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. आकर्षक मंडप सजावट, विद्युत रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती.

## कार्लेखिंड पात्रूदेवी मंदिरातील चोरीचा गेलेला मुद्देमाल सपूर्द



**अलिबाग : प्रतिनिधी**

कार्लेखिंड येथील भाविकांची श्रद्धास्थान असलेल्या पात्रूदेवी मंदिरात १२ जानेवारी रोजी चोरी झाली होती. अलिबाग पोलिसांनी या चोरीचा छडा लावला असून आरोपीला ४८ तासांत जेरबंद केले. महाशिवरात्रीचे औचित्य साधून शनिवारी (दि. १८) मंदिर प्रशासनाला चोरीला गेलेला मुद्देमाल पोलिसांनी सुपूर्द केला.

आमदार महेंद्र दळवी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम, अलिबाग पोलीस निरीक्षक शैलेश सणस आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. दिलीप घोडके राहणार पाथर्डी (रा. अहमदनगर) असे अटक झालेल्या चोरट्याचे नाव आहे. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव पोलिसांनी आरोपीला एका गुन्ह्यात अटक केली होती.

## मासळीची आवक घटल्याने दर वधारले

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड हे पर्यटनस्थळ असल्याने येथे दर शनिवार-रविवार पर्यटकांची गर्दी असते, मात्र मासळीची आवक कमी झाल्याने बाजारात दरही वाढले आहेत. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमधून नाराजी वाढली आहे.



(छाया : संजय करडे)

वातावरणातील बदलामुळे मच्छिमारांचे मोठे आर्थिक नुकसान होऊन ते कर्जबाजारी झाले आहेत. बदलत्या वातावरणाचा गंभीर परिणाम मच्छिमारांना सहन करावा लागला आहे. खोल समुद्रात जाऊनसुद्धा मुबलक मासळी मिळत नाही. त्यामुळे मच्छीमार पुरते हैराण झाले आहेत. मुरूड तालुक्यात लहान व मोठ्या अशा ७००पेक्षा जास्त होड्या मच्छीमारी करीत आहेत.

मुरूडच्या समुद्रात पडलेला मासळीचा दुष्काळ अद्याप कायम असून त्यामुळे मच्छीमारांनी मुरूड आणि एकदरा या खाडीत बहुतांश नौका नांगरल्या आहेत. सुरमई, पापलेट, कोळंबी, घोळ, जिताडा अशी मोठी मासळी मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने भाव आवाक्यात होते. आज एकदम उलट परिस्थिती आहे. तालुक्यात सध्या कमी प्रमाणात मासळी सापडत असल्याने मासे खवय्याचे मोठे हाल झाले आहेत. सध्या मोठी किंमत मोजून मासळी खरेदी करावी लागत आहे.

### मासळीचे प्रकार व दर

**हलवा एक नग-८०० रु.**
**पापलेट सहा नग-१५०० रु.**
**सुरमई मध्यम-१२०० रु.**
**मोठी सुरमई-५००० रु.**
**रावस मध्यम-१००० रु.**

**बदलते हवामान असल्याने याचा फटका मच्छिमारांना सहन करावा लागत आहे. कधी थंड तर कधी उष्ण असे हवामान राहत आहे. शिवाय समुद्राच्या तळाशी घडामोडींमुळेसुद्धा मासळी दूर पळून जाण्यास होत आहे. मासळीचा तुटवडा निर्माण झाला आहे.**

**-मनोहर बैले, उपाध्यक्ष, रायगड जिल्हा मच्छीमार संघ**

## गर्जा महाराष्ट्र न्यूज पोर्टलचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन







**पेण : रामप्रहर वृत्त**

गर्जा महाराष्ट्र लाईव्ह न्यूज चॅनल व ऑनलाईन न्यूज पोर्टलचे उद्घाटन नुकतेच पेण येथे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पेणचे आमदार रवीशेठ पाटील यांच्या हस्ते झाले.

भाजपचे नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी सुरू केलेले या न्यूज पोर्टलला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

रायगड जिल्हा हा मुंबईचे जवळ असल्यामुळे आता या जिल्ह्यांमध्ये भरपूर प्रमाणात विकास कामे होत आहे व वेगवेगळ्या घडामोडी घडत आहेत. सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी निश्चितच या न्यूज पोर्टलचा सामान्य जनतेला उपयोग होईल, असे आमदार रवीशेठ पाटील यांनी सांगितले, तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये प्रतिनिधींमार्फत ऑनलाईन न्यूज पोर्टल व युट्यूब न्यूज चॅनल ते लवकरच ते उच्च पातळीवर नेतील यात शंका नाही, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले.

या वेळी उपप्रदेशाध्यक्ष मुंबई प्रकाश दरेकर, उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ दादा पाटील, राजेश मापारा, अविनाश कोळी, अमित घाग, छंदम भोईर, मिलिंद पाटील, रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर, सरचिटणीस आनंद लाड, ज्ञानेश्वर शिर्के, श्रेया कुंटे, प्रियंका पिंपळे आदी उपस्थित होते.

## भातपिकाची स्पर्धाक्षम मूल्यसाखळी विकसित करावी -दशरथ तांबाळे

**कर्जत : प्रतिनिधी**

भातपिकाचे स्पर्धात्मक मूल्यमापन करण्यासाठी शेतकऱ्यांनी भाताच्या वाणाची मूल्य साखळी विकसित करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या आत्मा विभाग संचालक दशरथ तांबाळे यांनी केले. शेतकरी उत्पादक कंपनी, पुरवठादार, कृषी शास्त्रज्ञ आणि शेतकरी परिषदेमध्ये तांबाळे बोलत होते.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत विभागीय अंमलबजावणी कक्ष कोकण विभाग ठाणे कार्यालयाच्या वतीने एकदिवसीय भातपिकावर आधारित विभागस्तरीय उत्पादन तंत्रज्ञान आणि बाजार संमेलनाचे आयोजन प्रादेशिक कर्जत येथे करण्यात आले होते. कोकण विभागातील स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी शेतकरी, उत्पादक कंपनी, निविष्ठा पुरवठाधारक, कृषी विद्यापीठ आणि संशोधन केंद्र शास्त्रज्ञ, प्रक्रियादार, निर्यातदार, तंत्रज्ञान पुरवठादार प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेत मूल्यसाखळीतील अडचणी आणि उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली. या परिषदेत सहभागी सर्व प्रतिनिधींनी आपल्या घटकांमधील अडचणी आणि समस्यांवर विभागीय तसेच जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडून दखल घेण्यात आली, तसेच तांत्रिक आणि धोरणात्मक अडचणी सोडवण्यासाठी निश्चितच प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले.

या वेळी विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे अंकुश माने, पणन मंडळ मुंबई डॉ. भास्कर पाटील,संशोधन संचालक कृषी संशोधन केंद्र कर्जत एस. बी. भगत, डी. डी. एम. नाबार्ड अपसुंदे यांनी मार्गदर्शन केले. लाभार्थ्यांनी स्मार्टसारख्या प्रकल्पातून केवळ आर्थिक अनुदान मिळवण्यापेक्षा त्यातून शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण करावेत, असे सूचित करण्यात आले. समुदाय आधारित संस्था प्रतिनिधींसाठी राज्यांतर्गत प्रशिक्षणासह अभ्यास दौऱ्याबाबत चर्चा करण्यात आली. कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञांशी चर्चा करून पुढील हंगामात राबवावयाच्या प्रस्तावित मूल्यसाखळीची रूपरेषा ठरविण्यात आली.



(छाया : विजय मांडे)

## जैन प्रीमियर लीगमध्ये रजवाडा रेंजर्स अजिंक्य



**कर्जत : प्रतिनिधी**

जैन संघटनेतर्फे आयोजित जैन प्रीमियर लीगमध्ये रजवाडा रेंजर्स या संघाने राठोड स्मॅशर्स या संघाचा अंतिम सामन्यात पराभव विजय मिळविला. बीएच स्टार संघाला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

बामचा मळा येथील मैदानावर जैन प्रीमियर लीग या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ऋषभ इंडियन्स, पारस पायरेट्स, रजवाडा रेंजर्स, राठोड स्माशर्स, चिंटू राइडर्स, पियुष वारीयर्स, धनराज टायटन, ए. डी. स्ट्राईकर्स, भारत ब्लास्टर्स, बी. एच. स्टार, डी. सेव्हन सिक्सर आणि सी. टी. सुपरकिंग्स या १२ संघांनी सहभाग घेतला होता. पाच षटकांचे एकूण ३३ सामने खेळविण्यात आले. शैलेश चव्हाण, अमित डांगरे, संजय जैन, जिग्नेश जैन यांनी पंच म्हणून कामगिरी पार पडली.

या स्पर्धेचा मालिकावीर म्हणून परब जैन याने बहुमान मिळविला. उत्कृष्ट क्षेत्ररक्षण म्हणून प्रणय ओसवाल, उत्कृष्ट फलंदाज म्हणून आयुष ओसवाल आणि उत्कृष्ट गोलंदाज म्हणून मोहित ओसवाल याला सन्मानित करण्यात आले.

## पत्रकार चषक क्रिकेट स्पर्धेत नागोठणे विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार चषक क्रिकेट स्पर्धेत नागोठणे संघाने विजेतेपद मिळवून पत्रकार चषक पटकावला. गोरेगाव संघ उपविजेता ठरला. महाड व कर्जत संघ उपांत्य उपविजेते ठरले.

रायगड जिल्ह्यातील पत्रकारांची क्रिकेट स्पर्धा शनिवारी (दि. १८) जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे खेळविण्यात आली. अंतिम फेरीत नागोठणे संघाने गोरेगाव संघाचा पराभव केला. पहिल्या उपांत्य सामन्यात नागोठणे संघाने कर्जत संघाचा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात महाड संघाचा पराभव करून गोरेगाव संघाने अंतिम फेरी गाठली.

नागोठणे संघाचा गणेश गोरे याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू गौरवण्यात आले. गोरेगाव संघाचा वैभव टेंबे याची उत्कृष्ट गोलंदाज म्हणून तर कर्जत संघाचा तुषार जोशी याची उत्कृष्ट फलंदाज म्हणून निवड करण्यात आली. रोहा संघाला शिस्तबद्ध संघ म्हणून गौरवण्यात आले. पेण संघाला आकर्षक गणवेशाचे बक्षीस देण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. अलिबागचे माजी नगराधाक्ष प्रशांत नाईक, रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, एलसीबीचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, महसूल चिटणीस सचिन शेजाळ, वेश्वी ग्रामपंचायत सरपंच गणेश गावडे, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धा समितीचे सदस्य प्रकाश पावसकर या वेळी उपस्थित होते. रायगड पोलीस विरूद्ध महसूल विभाग असा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. सर्वपक्षीय राजकीय नेते विरुद्ध अलिबाग पत्रकार असा दुसरा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सनदी लेखापाल संजय राऊत, अ‍ॅड. प्रसाद पाटील, दैनिक रामप्रहरचे संपादक देवदास मटाले, अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक शैलेश सणस, आशिष भट आदी या वेळी उपस्थित होते.



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites E-Tender from registered SRM vendors on MAHATRANSCO website

| Sr. No. | Tender No. | Tender Name | Tender Amount | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-2/ 2022-23 **RFx No. 7000026178** | SRM E-Tender for Providing Daily Sweeping/ Cleaning Services along With Cleaning Materials at Major Stores, Panvel for the FY 2023-24 | Rs. 3.20 Lakh | 22.02.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD Amount:** Rs. 5,000/- **Tender Fee:** 590/- incl. GST for submission of bids.

For more details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** DY EE. Mob. No. 9930057633

**Sd/-**
**EE, Major Stores, Panvel**

## निवडक

### 'विद्याभवन'मध्ये शिवजयंतीचा जल्लोष



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात छत्रपती शिवाजी महाराज जयंती सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी विविध उपक्रमांद्वारे साजरी केली. शनिवार सुटी आणि सोमवारी पर्यटन मंडळ आयोजित शिवनेरी सहल नियोजित असल्यामुळे हार्दिक कार्यक्रम शुक्रवारी घेण्यात आला. या कार्यक्रमास संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, समन्वयक पांडुरंग मुळीक, जयश्री तिपायले, अविनाश कुलकर्णी, दत्तात्रय आटपाडकर आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षदा दगाबाज आणि प्रियदर्शनी कोरडे या विद्यार्थिनींनी केले.

### महाशिवरात्रीनिमित्त फळांचे वाटप



**उरण :** तालुक्यातील कळंबुसरे येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांना उपवासाचे पदार्थ म्हणून केळी या फळाचे वाटप करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, सचिव प्रेम म्हात्रे, खजिनदार सुरज पवार, सहखजिनदार गणेश म्हात्रे, रोहन पाटील, विक्रांत पाटील, साहिल म्हात्रे, आकाश पवार, शुभम ठाकूर, प्रणित पाटील, तेजस सणस, निकिता पाटील, सानिका पाटील, सत्यजित थोरात आदी संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### देऊळवाडीत भाविकांना प्रसादाचे वाटप



**उरण :** शहरातील देऊळवाडी येथील श्री संगमेश्वर महादेव देवस्थान (श्री शंकर मंदिर) हे प्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र असून दर सोमवारी, महाशिवरात्रीला येथे भाविक भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते. महाशिवरात्री निमित्त देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळातर्फे भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंडळाचे तसेच देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाचे निरंजन नार्वेकर, संतोष चव्हाण, प्रफुल्ल म्हात्रे, महेश झुजम, तुषार म्हात्रे, मंगेश म्हात्रे, योगेश शेलार, विपुल झूजम, सतीश पुजारी, जतिन तवसाळकर, प्रवीण सुर्वे, प्रसाद म्हात्रे, विठ्ठल ममताबादे, रोमेश भुवड, भूषण म्हात्रे, आकाश जाधव, निशांत चव्हाण, आशिष न्यायी, साईनाथ ममताबादे, वेदांत नाईक, रोहन पटेल, चिराग पटेल, गिरीश गुडेकर अमित राव, कमलाकर घरत आदी या वेळी उपस्थित होते.



**नवी मुंबई : महाशिवरात्रीनिमित्त आमदार मंदा म्हात्रे यांनी सीबीडीतील नागेश्वर मंदिर, अग्रोळी गावातील अमृतेश्वर मंदिर, सारसोळे गावातील बामनदेव मंदिर आदी मंदिरांत जाऊन शिवशंकराचे दर्शन घेतले. या वेळी भाजप महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, मनोज मेहेर, देवनाथ म्हात्रे, गजानन पाटील, श्याम पाटील, निलेश पाटील, संजय ओबेरॉय, अलका कामत, राम खंडागळे उपस्थित होते.**

# उरण, पनवेल, नवी मुंबईत महाशिवरात्री उत्साहात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाशिवरात्री निमित्ताने नवी मुंबईतील नेरूळमधील श्री गणेश शिव ब्रम्हांडेश्वर मंदिर यासह विविध शिवमंदिरात महाशिवरात्रोत्सव विधिवत मोठ्या धार्मिक उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री गणेश शिव ब्रम्हांडेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री निमित्ताने मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावलेल्या आहेत. नेरूळसह जुईनगर, सानपाडा, वाशी तसेच आजूबाजूच्या विविध भागातील भक्तांनी महादेवाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

महाशिवरात्रीला अनेक भक्त उपवास करून देवाचे दर्शन घेत असतात यावर्षी श्री गणेश शिव ब्राह्मंडेश्वर मंदिर नेरूळ मध्ये महाशिवरात्रीनिमित्त सकाळ ते संध्याकाळ विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कैलास पाटील, विशाल तांडेल, स्नेहल पाटील, कौस्तुभ पाटील तसेच श्री गजानन देवस्थान कार्यकारी मंडळ सारसोळे व सेक्टर ६चे रहिवासी गजानन संप्रदायिक भजन मंडळ सारसोळे सह विविध नागरिक आणि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली बिमा नाक्यावर शिवसेनेच्या वतीने महाशिवरात्री निमित्त महादेवाची महाआरती करण्यात आली. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण देण्याचा निर्णय घेतल्याने महाशिवरात्रीनिमित्त शिवसेनेने महापूजा करून आनंद साजरा केला. या वेळी पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



पनवेल तालुक्यात महाशिवरात्र उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी मंदिरामध्ये शिवभक्तांनी गर्दी केली होती. दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दरम्यान, कळंबोली बिमा नाक्यावर शिवसेनेच्या वतीने महादेवाची महाआरती करण्यात आली. मोठ्या भक्ती भावाने शिवसैनिकांनी महादेवाची आराधना केली. त्यामुळे या परिसराचे वातावरण भक्तीमय झाले होते.

या वेळी ज्येष्ठ मार्गदर्शक विलासशेठ कदम, अरुण तरंगे, उपमहागर संघटक आबासाहेब लकडे, लहुशेठ मलकमिर शंकरशेठ वीरकर, पक्षाचे कळंबोली शहराध्यक्ष तुकाराम सरक, अमृत तरंगे, रणजीत फडतरे, दत्ता शिंदे, शरद कदम, कासले, अल्पेश माने यांचा सह शिवशंकर भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाशिवरात्रीनिमित्त बिमा नाक्यावर भाविकांना उपवासाची खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात आले.

**उरण : वार्ताहर**

महाशिवरात्री निमित्त शिवभक्तांनी ठिकठिकाणच्या शिवमंदिरामध्ये गर्दी केली होती. यात आवरे, मोरा, बोरीगाव (होनेर्श्र्वर), देऊळवाडी (संगमेश्वर), माणकेश्वर, उरण रेल्वे स्टेशन ( नीलकंठेश्वर ), कळंबुसरे , चिरनेर, घारापुरी, कासारभट तसेच या भागातील अनेक शिव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यातील प्रत्येक देवळात शिव शंकराच्या दर्शनासाठी सकाळपासूनच रांगा लावण्यात आल्या होत्या. पहाटे शिव भोळेनाथाची पूजा, अर्चा व अभिषेक केल्यानंतर मंदिरे भाविकांना दर्शनासाठी खुली करण्यात आली. मंदिरामध्ये शिव भोळेनाथाचा गजर सुरू होता.



## हेटवणे जलवाहिनी दुरुस्तीचे काम

**उरण : वार्ताहर**

सिडको हेटवणे पाणीपुरवठा योजने अंतर्गत हेटवणे धरणातून, नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीची देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यासाठी हेटवणे धरणाच्या जलशुद्धीकरण केंद्रातून, सोडण्यात येणारे पाणी बुधवारी (दि. २२) सकाळी ९ वाजल्यापासून ते गुरुवारी (दि. २३) सकाळी ९ वाजेपर्यंत बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे हेटवणे जलवाहिनीवरील सर्व गावांचा पाणीपुरवठा, वरील कालावधी दरम्यान बंद राहणार असल्याची माहिती सिडकोच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली. यात नवी मुंबईत येणाऱ्या द्रोणागिरी, उलवा नोड, खारघर तसेच उरण व पेण तालुक्यातील अनेक गावांचा पाणीपुरवठा बंद होणार आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी आपल्या सोयीसाठी अगोदरच पाण्याचा साठा करून घ्यावा, त्याचबरोबर दोन दिवस पाण्याची बचत करून, पाणी जपून वापरावे, असे आवाहन सिडको प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**पाणीपुरवठा दोन दिवस राहणार बंद**

दरम्यान, जलवाहिनीची देखभाल व दुरुस्तीनंतर पुढील २४ तास जलवाहिनीतून सोडण्यात येणारे पाणी कमी दाबाने सोडण्यात येणार असल्याचेही संबंधित ग्रामपंचायतींना दिलेल्या निवेदनात सिडको प्रशासनाने म्हटले आहे.

## नवी मुंबईत १५१ मालमत्ताधारकांना जप्तीची नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने पुन्हा एकदा थकीत मालमत्ताधारकांसाठी १५ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत विशेष अभय योजना आणली आहे. थकीत मोठ्या १७१ मालमत्ताधारकांना नोटीस बजावल्या असून १५१ मालमत्ताधारकांना जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे.

नियमित कराच्या वसूलीप्रमाणेच महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी थकित मालमत्ता कराच्या वसूलीकडेही तितकेच लक्ष दिले आहे. जे नागरिक आर्थिक अडचणींमुळे मालमत्ता कर विहीत वेळेत भरू शकले नाहीत, अशा मालमत्ताकर धारकांना त्यांच्या थकबाकीमुळे लागलेल्या दंडात सवलत मिळावी यादृष्टीने आयुक्त नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारीपासून १५



मार्चपर्यंत थकीत मालमत्ता कराच्या दंडात्मक रक्कमेवर ७५ टक्के इतक्या मोठ्या प्रमाणावर सूट दिली. आर्थिक वर्षात ३१ मार्चपर्यंत ५७५ कोटींचे वसूलीचे उदिष्ट मालमत्ता विभागासमोर आहे. तर २०२३-२४ साठी ८०० कोटींचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. अनेक मालमत्तांमध्ये अंतर्गत बदल झाल्याचे निदर्शनास येत असून महापालिका क्षेत्रातील मालमत्तांची अत्याधुनिक लिडार प्रणालीद्वारे सर्वेक्षण कार्यवाही सुरु केली आहे.

१६ फेब्रुवारीपासून ३१ मार्चपर्यंत ५० टक्के सूट देणारी अभय योजना लागू करण्यात येत असल्याचे जाहीर केले. मार्च २०२३ अखेर ५७५ कोटी रुपये वसूली तीन लाख २९ हजार २९६ मालमत्ता करनिर्धारीत करण्यात आल्या असून निवासी दोन लाख ६३ हजार ०९७, अनिवासी ६० हजार ०८५, औद्योगिक सहा हजार ११४ अशा मालमत्ता आहेत.

नोव्हेंबर २०२२ अखेर २९६.५५ कोटी रुपये मालमत्ता कराची वसूली केली. मार्च २०२३ अखेर २७८.४४ कोटी रुपये अशी एकूण ५७५ कोटी रुपये वसूली होईल, अशी अपेक्षा आहे. २०२३-२४ मध्ये ८०१ कोटी रुपये जमा होण्याचा अंदाज आहे.

# पनवेलमध्ये रासपचा कोकण विभागीय मेळावा

## आमदार महादेव जानकर करणार मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय समाज पक्षाचा (रासप) कोकण विभागीय कार्यकर्ता मेळावा मंगळवारी (दि. २१) दुपारी २ वाजता पनवेल येथील आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, माजी मंत्री आमदार महादेव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यकर्ता मेळाव्याला मोठ्या संख्येने कोकण विभागातील रासप कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन



रासपचे कोकण विभागीय अध्यक्ष भगवान ढेबे, रायगड महिला आघाडी अध्यक्षा मनीषा ठाकूर, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख संतोष ढवळे, पनवेल तालुका अध्यक्ष मुकेश भगत यांनी केले आहे

या मेळाव्यात माजी मंत्री आमदार महादेव जानकर हे कोकणातील कार्यकर्त्यांशी मेळावा घेऊन संवाद साधणार आहेत. या कोकण विभागीय मेळाव्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे एम्प्लॉईज फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. एल. अक्कीसगर, राष्ट्रीय सरचिटणीस कुमार सुशील, राष्ट्रीय संघटक बाळकृष्ण लेंगरे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशीनाथ शेवते व महाराष्ट्र मुख्य महासचिव, ज्ञानेश्वर माऊली सलगर व महाराष्ट्रातून इतर वरिष्ठ कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.पनवेल येथील कार्यकर्ता मेळाव्यात आमदार महादेव जानकर कार्यकर्त्यांनी संवाद साधणार आहेत, तर आगामी काळात येणाऱ्या निवडणूका आणि पक्षाची ध्येयधोरणे या विषयावर कार्यकर्त्याशी संवाद साधणार आहस्थ. त्यामुळे या मेळाव्याला पालघर ठाणे, रायगड रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रासप रायगड महिला आघाडी अध्यक्षा मनीषा ठाकूर यांनी केले आहे,

## सोमेश्वर मंदिर मार्गाचे उद्घाटन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप प्रभाग क्र. ३२ च्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून शिरवणे येथील सोमेश्वर मंदिर मार्ग नामफलकाचे उद्घाटन नवी मुंबईचे महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेविका माधुरी सुतार, सामाजिक कार्यकर्ते जयेंद्र सुतार तसेच प्रभागातील पदाधिकारी जयेश पवार, सोमनाथ घरत,प्रफुल्ल भोईर, गिता घरत, अक्षता घरत, शिल्पा घरत, वासंती सुतार, कविता पल्लई व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. प्रभाकर पटवर्धन यांच्या स्मृती दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती संचालित डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाचा २५ वा वर्धापन दिन आणि डॉ. प्रभाकर पटवर्धन यांच्या २६ व्या स्मृती दिनानिमित्त २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे तपासणी, जनरल मेडिसीन, नाक, कान, घसा, अस्थि रोग, महिलांचे आजार, दंत रोग, त्वचारोग या रोगांवर मोफत तपासणी करण्यात येणार आहे. रोगाचे निदान झाल्यावर शस्त्रक्रियेमध्ये २५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ९९६७६५२७५७, ८९७६९९०५४१, ८९७६९९०५४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दरम्यान, रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या वतीने मंगळवारी (दि. २१) सायंकाळी ६.३० वा. शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे ज्येष्ठ रंगकर्मी शरद पोंक्षे यांच्या 'सावरकर विचार दर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या व्याख्यानाला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विरुपाक्ष मंदिरात स्वरशंकरा मैफिल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील विरुपाक्ष मंदिर न्यासाच्या वतीने महाशिवरात्रपर्वणीनिमित्ताने 'स्वरशंकरा' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विरुपाक्ष मंदिराध्ये झालेल्या या कार्यक्रमात युवा गायक श्रीधर पाटणकर आणि श्रुती बुजरबरुवा यांचे गायन झाले. श्रीधर पाटणकर यांनी शिवपञ्चाक्षरस्त्रोत्र पठण करून गायनाला प्रारंभ केला. त्यानंतर श्रुती बुजरबरुवा यांनी सोऽहम् हर डमरू बाजे हे नाट्यपद सादर केले. त्यानंतर विविध अभंग, नाट्यपदे व भक्तिगीतांचे सादरीकरण या गायकांनी केले. सुमधुर आवाज, आलापी, सुस्पष्ट ताना या त्रिसुत्रींच्या बळावर रंगलेले गायन रसिकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले.

अथर्व देव यांनी संवादिनी, सोहम जोशी यांनी तबला, विशाल जोगळेकर यांनी पखवाज तर समीर सोमण यांनी तालवाद्यांची साथ केली. किरण बापट यांनी संगीत संयोजन व सर्वेश गोखले यांनी ध्वनिसंयोजन केले. विरुपाक्ष मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यानी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

# उरण येथे शिवजयंती उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प हार घालून शिवजयंती साजरी करण्यात आली.

या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, भाजप तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका दमयंती म्हात्रे, उरण शहर महिला भाजप अध्यक्ष संपूर्णा थळी, अधिकारी सुरेश पोसतांडेल, जगदानी, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, जयराम पाटील, जगदीश म्हात्रे, विशाल गायकवाड, महादेव सिध्येश्वरी, धनंजय आंब्रे, विजय पवार, विलास म्हात्रे, देविदास कोळी, नितीन चौधरी आदी उपस्थित होते.



# रायगड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष

## देशात व राज्यात २०२४नंतरही युतीचे राज्य –खासदार बारणे

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना खोपोली शहर मध्यवर्ती संपर्क कार्यालयाचे उद्घाटन खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते रविवारी (दि. १९) करण्यात आले.

या वेळी झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे ज्या ज्या ठिकाणी अस्तित्व होते असे शिवसेना भवन व 'मातोश्री'वर आमची शिवसेना कुठल्याही प्रकारचा दावा करणार नाही, कारण ही ठिकाणे आमच्या श्रद्धेची ठिकाणे आहेत. २०२४नंतरही केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिवसेना युतीचे व राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भक्कम युती सरकार अस्तित्वात असेल, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे ज्यांना मुख्य प्रवाहात येऊन जनतेची सेवा करायची आहे त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करून सक्रिय होण्याचे आवाहनही खासदार श्रीरंग बारणे यांनी केले.


(छाया : विनायक माडपे)

आमदार महेंद्र थोरवे यांच्या संकल्पनेतून हे मध्यवर्ती संपर्क कार्यालय अस्तित्वात आले आहे. या वेळी बोलतांना आमदार थोरवे यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनाच खरी शिवसेना असल्याचे निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयामुळे सिद्ध झाले आहे. याच शिवसेनेला हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद असून महाशिवरात्री दिनी शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह मिळणे म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भगवान शंकराचाही आशीर्वाद प्राप्त झाली असल्याने थोरवे यांनी सांगितले. भूतकाळात काय व कशामुळे झाले हे जनतेला माहिती आहे. हिंदुत्ववादी विचार व छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा आचार या नुसार शिवसेना कार्यरत असून जनतेच्या समस्या व न्याय देण्यासाठी कशाचीही कमी पडणार नसल्याचे आमदार थोरवे यांनी यावेळी सांगितले. आपल्यात व खासदार बारणे यांच्यात कोणतेही मतभेद नसून, या फक्त विरोधी पक्षांनी उडवलेल्या वावड्या असल्याचेही थोरवे यांनी या वेळी आवर्जून स्पष्ट केले. आगामी खोपोली पालिका निवडणूक व जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक बहुमताने जिंकण्याचा निर्धार थोरवे यांनी केला. त्यासाठी सर्वांनी एकजुटीने कामाला लागण्याचे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

या वेळी खोपोली शहरातील उद्धव ठाकरे शिवसेना गटातील काही पदाधिकाऱ्यांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला, तसेच खोपोली शहर महिला आघाडीसाठी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र खासदार बारणे व आमदार थोरवे यांच्या हस्ते देण्यात आली. कर्जत मतदार संघ पक्षप्रवक्ते म्हणून अमोल बांदल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर प्रमुख संदीप पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शहर संपर्क प्रमुख तात्या रिठे यांनी तर आभार प्रदर्शन शहर समन्वयक राजू गायकवाड यांनी मानले. जिल्हा संपर्क प्रमुख विजय पाटील, उपाध्यक्ष भाई गायकर, गोविंद बैलमारे, पंकज पाटील यांच्यासह कर्जत मतदारसंघ, खोपोली शहर, खालापूर तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद कार्यालयातील प्रांगणात शिवजयंतीनिमित्त महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांना प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्राचे राज्यगीत गाण्यात आले.

शिवछत्रपती महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, महाराष्ट्र राज्यगीताचा विजय असो, अशा घोषणा देण्यात आल्या. लक्ष्मीखार व दत्तवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासही मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या वेळी माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, नगर परिषद कार्यालयीन अधिकारी परेश कुंभार, मेघाली पाटील, महाविद्यालय उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, माजी नगरसेवक मनोज भगत, युगा ठाकुर, सतेज निमकर, प्रमोद भायदे, सुदेश माळी, मनोज पुलेकर, नंदकिशोर अंबेतकर, संजय वेटकोळी, भुसाणे, पांडुरंग आरेकर, दिपाली दिवेकर, प्रकाश आरेकर, प्रशांत दिवेकर, अशोक सबनिस, विजय सुर्वे, सतीश जंजिरकर, दिपक शिंदे, प्रशांत कासेकर, मराठी शाळेतील शिक्षक आदींसह शिवभक्त उपस्थित होते.





**रोहे : प्रतिनिधी**

कोएसोच्या डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाच्या इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी प्रा. तुळशीदास मोकल, प्रा. सुकुमार पाटील, प्रा. सीमा भोसले, डॉ. कमलाकर कांबळे, प्रा. वैशाली कानावडे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे, असे सांगत तुम्ही युवकांनी त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा आदर्श अंगीकारला तर खऱ्या अर्थांने तुमचेही आयुष्य सर्वांगसुंदर होईल, असे मार्गदर्शन केले. प्रा. तुळशीदास मोकल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन व कार्यावर आधारीत व्याख्यान दिले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे, त्यांची कामगिरी, गनिमी कावा, युद्धतंत्र व छत्रपती शिवाजी महाराजांकडे असणारा स्त्रीयांबद्दलचा आदरभाव या मुद्यांना अनुसरून उपस्थितांना प्रबोधित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुकुमार पाटील यांनी तर आभार प्रा. सीमा भोसले यांनी मानले.

**नागोठणे : वार्तहर**

कोएसो आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या पोवाड्याने झाली. करण मडवी, समर खांडेकर, दिपेश कुथे आदींनी यात सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात शिवरायांनी उभारलेल्या आरमाराविषयी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी दिली. अनुजा वाटवे, साक्षी पवार, सृष्टी तेलंगे, ओमकार खांडेकर, मंथन पाटील यांनी शिवरायांच्या विविध कार्यावर व विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांनी शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी तरूणांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे सांगितले. त्याचबरोबर शिवरायांनी अंगिकारलेल्या मुल्यांची पायमल्ली होणार नाही यांची खबरदारी घेण्याविषयी विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वरूप मुंडे याने तर आभार प्रदर्शन महिमा हिने केले. शेवटी शिवरायांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.







**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दिवसभर जय शिवराय, जय जिजाऊं यांच्या जयजयकाराने आसमंत दुमदुमला होता.

नगरपालिकेच्या कार्यालयापासून कर्मचारी अधिकारी वर्गाने देखील भगवे फेटे परिधान करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात हजेरी लावली. या वेळी आमदार रवीशेठ पाटील, प्रांत अधिकारी विठ्ठल इनामदार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, माजी उपनगरध्यक्षा वैशाली कडू, प्रशासकीय अधिकारी राजाराम नरुटे, गटनेते अनिरुद्ध पाटील व नगरसेवक सामील झाले होते. महाराजांच्या अर्थ पुतळ्याची विधीवत पुजा केल्यानंतर प्रशासक तथा मुख्याधिकारी जिवन पाटील यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर पेण नगर परिषदेच्या सभागृहात प्राचार्य एम. एन. पाटील यांचे शिवव्याख्यान झाले. संभाजी ब्रिगेडकडून जिल्हाध्यक्ष परमानंद जांभळे, स्वप्निल म्हात्रे, आनंद जाधव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

पेण एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र शिक्षण संस्था, महिला शिक्षण संस्था पेण, नगरपालिका शाळांध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.





**पाली : बेणसेवाडी येथे शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. या वेळी शिवप्रेमींनी पारंपरिक वेशभूषा करून लेझीम व दांडपट्टा आदी साहसी खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले.** (छाया : धम्मशील सावंत)

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना व मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट असोसिएशनतर्फे समर्पण रक्तपेढी घाटकोपर यांच्या सहकार्याने शिवजयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरात ७१ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील हे ४७०वे रक्तदान शिबिर ठरले.

शिबिराचे उद्घाटन सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आहे. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास पिलेवान, इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, प्रा. संजय पाटील, प्रा. सोनल पाटील, प्रा. प्रवीण नेरपागर, प्रा. शब्बीर कर्जतवाला, दीपक बोराडे, दिनेश तरे, संदीप लाड, नीरज लाड, निश्चल शिंदे, राहुल देशमुख, समीर लाड, निलेश लबडे, विद्यार्थी संघटनेचे निशांत पाटील, जयेश थोरवे, अदिती हांडे, तृष्णा देवकर, लौकिक काळे, अथर्व गोडांबे, ओमकार श्रीखंडे, इम्रान मुल्ला, आमिर मणियार, डॉ प्रशांत सदावर्ते आदी उपस्थित होते.

समर्पण रक्तपेढीचे डॉ. प्रकाश एवाले, शीला वाघमारे, प्रदीप नितोरे,धनश्री लाड, राजेश सोलंकी, सोहम जाधव, सुमित जाधव, कार्तिक वर्मा, अनिकेत जाधव, अक्षय सुर्वे आदींनी रक्तसंकलनाचे काम केले.





**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवराज प्रतिष्ठानकडून किल्ले भिवगड येथून शिवज्योत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे आणण्यात आली.

रविवारी सकाळी डेक्कन जिमखाना येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून शिवज्योत प्रज्वलित करून बाईकस्वार शिवप्रेमी निघाले. शिवराज प्रतिष्ठानचे प्रतीक ठाकरे, विकी गुरव, सचिन भोईर, जगदीश गुटे, सचिन लांगी, ऋषी बोराडे, अजय डेरवणकर, प्रियंका भासे, रुचिता कडू, स्नेहल चव्हाण, चित्रा भोईर, रोशन पवार, अजित पवार, संकेत ठाकरे, आकाश बघे, सौरव घुमरे आदींसह इतर किल्ले भिवगड येथे पोहचले.

देवीचे दर्शन घेऊन शिवप्रेमी १० किमी अंतर पार करण्यासाठी निघाले होते. भगवे ध्वज फडकवित हे शिवप्रेमी दुपारी १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पोहचले.



**खोपोली : प्रतिनिधी**

भाजप खोपोलीच्या वतीने शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास जिल्हा महिलाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, युवा अध्यक्ष अजय इंगुलकर, ओबीसी सेलचे सचिन मोरे सुनील नांदे, मीडिया सेलचे राहुल जाधव, वैद्यकीय सेलचे विकास खुरपडे, व्यापारी संघटनेचे कीर्ती ओसवाल, ज्येष्ठ कार्यकर्ते रमेश रेटरेकर, महिला आघाडीच्या अश्विनी अत्रे, सुमती महर्षी, माजी नगरसेविका अनिता शहा, यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी बोलताना जिल्हा महिलाअध्यक्ष अश्विनी पाटील यांनी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श तरूण पिढीने घेऊन अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगीताचे उत्साहपूर्ण वातावरणात गायन करण्यात आले. निवासी जिल्हाधिकारी पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, तहसिलदार सचिन शेजाळ, विशाल दौंडकर तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# शिवजयंती



































जीवेत् शरदः शतम्!

**सुरेश कलगावकर**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

नरेश ठाकूर

जीवेत् शरदः शतम्!

**राकेश रांजणे**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

दर्शन पाटील


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com